मुंबई, दिनांक २३ मार्च २०१६

# रेडी रेकनर दरात माफक सुधारणा

**- एकनाथराव खडसे**

मुंबई, दिनांक २३ मार्च - काही वृत्तपत्रातून रेडी रेकनरचे दर १० टक्क्यांनी कमी होणार या शिषकाखाली प्रसिध्द झालेले वृत्त, चुकीचे, निराधार व वाचकांची दिशाभूल करणारे आहे. या संदर्भात महूलस मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज विधी मंडळात केलेले स्वयंस्पष्ट निवेदन खालील प्रमाणे आहे :-

वार्षिक मूल्य दर तक्ते प्रतिवर्षी दिनांक १ जानेवारी रोजी निर्गमित करण्यात येत होते. नियमात झालेल्या सुधारणांनुसार या वर्षी पासून वार्षिक मूल्य दर तक्ते दिनांक १ एप्रिल रोजी निर्गमित करण्यात येणार आहेत.

मागील वर्षात नोंदविलेले खरेदी विक्री व्यवहार, वास्तू प्रदर्शनातील दर, स्थानिक चौकशी, इत्यादी सर्व बाबींचा सारासार विचार करुन वार्षिक मूल्य दर तक्त्यातील दर ठरविले जातात.

मागील ५-६ वर्षात रेडी रेकनर दरात बरीच वाढ झाली होती. या वर्षी स्थावर व्यवसाय क्षेत्रात असलेली मंदी, नोंदविलेले खरेदी विक्री व्यवहार, स्थानिक चौकशी राज्यातील दुष्काळी परिस्थिती इत्यादी बाबींचा विचार करुन मागील ५-६ वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी माफक वाढ (Moderate Increase) करण्याचे प्रस्तावित आहे.

********